# भुयारी मेट्रोचे उर्वरित चार डबे दाखल

## संपूर्ण ट्रेनची लवकरच चाचणी




मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) - कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ मार्गाच्या पहिल्या ट्रेनसाठीचा चार डब्यांचा दुसरा काफिला आज पहाटे आरेतील सारीपूत नगर येथे दाखल झाला.

आंध्र प्रदेशातील श्रीसिटीहून मुंबईपर्यंत १४०० किलोमीटरचा पल्ला गाठत दहा दिवसांनंतर चार डब्यांचा हा दुसरा काफिला पोहचला आहे. प्रत्येक डबा ४२ टन वजनाचा असून खास प्रकारच्या ट्रेलरवरून आणण्यात आला. या ८-एक्सेल ट्रेलर्सना ६४ चाके असतात. येत्या दोन दिवसांत या डब्यांची जुळवणी करून सारीपूत नगरातील तात्पुरत्या सुविधेमध्ये एक ट्रेन बनवली जाईल. तिथेच चाचणी ट्रॅकसुद्धा उपलब्ध आहे. त्यानंतर तिथून मरोळ नाका मेट्रो स्थानकापर्यंतच्या तीन किलोमीटर लांबीच्या ट्रॅकवर चाचण्या घेतल्या जातील, असे मुंबई मेट्रो रेल महामंडळाकडून सांगण्यात आले.